## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- २४६/२०२०/नाशिक**

१ श्री. संजय कारभारी कुटे, : अपिलार्थी
मु. पो. बेलतगव्हाण, कुटे मळा,
देवळाली कॅम्प, ता. जि. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, नाशिक,
ता. जि. नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, नाशिक,
ता. जि. नाशिक.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक १३/१२/२०२१**

अपिलार्थी यांनी दिनांक १३/०१/२०२० रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक १३/१२/२०२१ रोजी meet.google.com/epa-stnu-axx या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीदरम्यान अपिलार्थी अनुपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

आज सुनावणीदरम्यान तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची

गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल".

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन आदेश पारित केला नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी दिनांक २५/०७/२०१९ रोजी तहसिलदार यांच्या कार्यालयात अर्ज दिला व त्या अर्जाची दखल घेऊन तहसिलदार यांनी पत्र क्र.आस्था-२/कावि/२३०/नाशिक/दि ०९/०८/२०१९ अपिलार्थी यांना पत्र दिले व ह्या पत्रावर दिनांक १४/०८/२०१९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व अपिलार्थी व कामगार तलाठी रमेश रघुनाथ कागदे हे हजर होते व दिनांक २५/०७/२०१९ च्या अर्जावर तहसिलदार यांनी काय निकाल दिला त्याची लेखी स्वरुपात माहिती व त्या निकालाच्या सत्य प्रतींची माहिती व अर्जदार यांनी व तलाठी यांनी स्वाक्षरी केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रतींची माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक ०४/०१/२०२० रोजी च्या पत्रान्वये सदर प्रकरणात कार्यवाही चालु असल्याबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक १७/०९/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १७/०९/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४/०२/२०२० रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्याबाबतचे निर्देश तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देण्यात येऊन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना समक्ष माहिती पुरविली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०४/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणात कार्यवाही चालु असल्याबाबत कळविले असल्याचे तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर कार्यालयातील उपलब्ध माहिती समक्ष पुरविली असल्याचे नमुद केले. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याबाबत कोणताही पुरावा/कागदपत्रे आयोगास सादर केलेले नाहीत. म्हणुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे, असे म्हणता येणार नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तरी आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक, श्री. परमेश्वर कासुळे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती पुरविली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(१) चे उल्लंघन केले आहे. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१)

अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(क) नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. अनिल दौंडे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. धांडे अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द वरील परिपत्रकास अनुसरुन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक २४६/२०२०/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, ता. जि. नाशिक.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलट टपाली आयोगाला सादर करावी, तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री. परमेश्वर कासुळे, (तत्कालीन जन माहिती अधिकारी), तहसिलदार, तहसिल कार्यालय, इगतपुरी, ता. इगतपुरी, ता. जि. नाशिक.